# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ औरंगाबाद.

**Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone No.2336172**


No,CGRF/AZ/R/148/2008/69/ Date :-

To,
The Executive Engineer ( Administration)
O/O Superintending Engineer
O&M Urban Circle, M.S.E.D.C.L.,
Aurangabad.

Sub :- Forwarding of grievance in respect of Shri Khataukar Deorao Kisan, Plot No.91, Gat No.138,Gayatri Chatrapati Nagar,Satara Parisar, Aurangabad.
(Consumer No. 490011365806).

Dear Sir

Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from Shri Khataukar Deorao Kisan, Plot No.91, Gat No.138,Gayatri Chatrapati Nagar,Satara Parisar, Aurangabad.

You are requested to submit your parawise reply on the grievance within 15 days from the date of this letter. **The hearing is fixed on 18.11.2007 at 11.30 Hours**

You are also requested to be present along with the concerned in charge at the time of hearing.

Member Secretary
CGRF, (AZ) MSEDCL,
Aurangabad.

Encl: As above.

Copy to:-

Shri Khataukar Deorao Kisan,
Plot No.91, Gat No.138,
Gayatri Chatrapati Nagar,Satara Parisar,
Aurangabad.

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१४८/२००८/६९**

**तक्रार दाखल दिनांक ;- ०१/११/२००८**
**निकाल दिनांक ;- २८/११/२००८**

**श्री देवराव किसण खटावकर,**
**प्लॅट न. ९१ गट न.१३८,**
**छत्रपती सातारा परीसर,**
**औरंगाबाद.**
**(ग्राहक क्र.४९००११३६५८०६) अर्जदार/ग्राहक**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित (शहर मंडळ,)**
**औरंगाबाद. गैरअर्जदार**

| | | |
|---|---|---|
| **कोरम** | **विष्णु अं. हंबिरे** | **अध्यक्ष** |
| | **हेमंत अ. कापडिया** | **सदस्य** |
| | **प्र. अ. सगणे** | **सदस्य/सचिव** |

## आदेश

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत

तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक ०१/११/२००८ रोजी औरंगाबाद शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, औरंगाबाद यांना पाठविण्यात आली व या बाबतीत त्यांचे म्हणणे १५ दिवसाच्या आत दाखल करण्याचे सांगण्यात आले. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक १८/११/२००८ रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) अर्जदाराने महावितरण कंपनीकडुन घरगुती वापरासाठी वीज पुरवठा घेतला असुन त्यांनी ऑक्टोबर २००७ पर्यंत वीज बिल नियमीतपणे भरले आहे. नोव्हेंबर २००७ मध्ये त्यांच्या मीटरचे चुकीचे वाचन करण्यात आल्यामुळे त्यांना ५९५९०/- रूपयाचे बिल आकारणी करण्यात आली. या चुकीच्या बिलाबाबत त्यांनी महावितरणच्या छावणी उपविभागाकडे तक्रार केली पण त्यांची कोणतीही दखल न घेता त्यांना ऑगस्ट २००८ चे १४६३५०/-रूपयाचे वीज बिल आकारण्यात आले. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीनुसार त्यांचे जुने मीटर हे ३०/०६/२००८ रोजी बदलण्यात आले. व या मीटरवर गेल्या चार महीन्याचा एकुण वीज वापर हा ५५१ युनिट असा नोंदविला गेला असल्याचे म्हटले आहे. महावितरण कंपनीने चुकीचे वीज बिल दुरूस्त न केल्यामुळे त्यांनी मंचात ही तक्रार दाखल केली असुन महावितरण कंपनीस सुधारीत वीज बिल देण्याबाबत आदेश देण्याची विनंती त्यांनी मंचास केली आहे.

२) दिनांक १८/११/२००८ रोजी झालेल्या सुनावणीस अर्जदार श्री खटावकर उपस्थित होते नोडल अधिकारी यांनी अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीवर आपला जवाब मंचात दाखल केला. अर्जदारास देण्यात आलेले बिल चुकीचे असल्याचे मान्य करीत सुधारीत वीज बिलाचा प्रस्ताव पुढील सुनावणीच्यावेळी दाखल करण्यात येईल असे सांगितले अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीचे निवारण होईपर्यंत त्याचा वीज पुरवठा खंडीत न करण्याचे आदेश देत मंचाने याप्रकणी पुढील सुनावणी २५/११/२००८ रोजी घेण्याचे निश्चीत केले.

३) दिनांक २५/११/२००८ रोजीच्या सुनावणीस अर्जदार व नोडल अधिकारी उपस्थित होते.नोडल अधिकारी यांनी स्थळपाहणी अहवाल तसेच मुख्य अभियंता यांना पाठविलेला बिल रिव्हीजन प्रस्तावाची प्रत मंचात दाखल केली मंचाने दोन्ही बाजुचे म्हणणे ऐकल्यावर प्रकरण निकालासाठी ठेवले.

४) अर्जदार व नोडल अधिकारी यांनी मंचात दाखल केलेल्या कागदपत्रावरून मंचास असे आढळुन येते की, महावितरण कंपनीकडुन अर्जदारास घरगुती वापरासाठी वीज पुरवठा करण्यात आला असुन त्यांच्या कडे बसविण्यात आलेल्या मीटरचा क्रमांक १००९५८८२ असा आहे. अर्जदारास डिसेंबर २००५ पर्यंत मीटर वरील नोंदीप्रमाणे वीज बिल आकारण्यात येत होते पण जुन २००६ ते ऑक्टोबर २००७ पर्यंत जुनी रिडींग ९७७ व चालु रिडींग ९७७ असे दाखवत सरासरीवर आधारीत वीज बिल आकारणी करण्यात आल्याचे दिसुन येते. महावितरण कंपनीतर्फे जुलै २००७ मध्ये देण्यात आलेल्या वीज बिलात अर्जदाराचे वीज बिल सुधारीत करून देण्यात आल्याचे सि.पी.एल. वरून स्पष्ट होते.

५) महावितरण कंपनीतर्फे जुलै २००७ मध्ये सुधारीत बिल आकारल्यानंतर ही अर्जदाराचे बंद असलेले मीटर बदलण्यात आले नाही व त्यांना पुन्हा मागील रिडींग ९७७ व चालु रिडींग ९७७ दाखवत सरासरीवर आधारीत बिल आकारणी करण्यात आली असल्याचे दिसुन येते. नोव्हेंबर २००७ मध्ये अर्जदारास मागील रिडींग ९७७ व चालु रिडींग ९९७७ अशी दर्शवत ९००० युनिट वीज वापराचे बिल आकारण्यात आले. या चुकीच्या घेण्यात आलेल्या रिडींगबाबत अर्जदाराने सतत केलेल्या तक्रारीची कोणतीही दखल न घेता महावितरण कंपनीने त्यांना जुलै २००८ पर्यंत सतत वरीलप्रमाणे रिडींग दाखवत सरासरीवर आधारीत वीज बिल आकारणी केली असल्याचे दिसुन येते.महावितरणतर्फे नोडल अधिकारी यांनी अर्जदारास नोव्हेंबर २००७ या काळात नोंदविलेला ९००० युनिट वीज

वापर चुकीचा असल्याचे सांगत सरासरी २०० युनिट वीज वापर ग्रहीत धरून सुधारीत बिलास मंजुरी देण्याचा प्रस्ताव मुख्य अभियंता यांना मंजुरीसाठी पाठविला असल्याचे  आपल्या जवाबात म्हटले आहे. नोडल अधिकारी यांनी २०० युनिट प्रतिमाह ही सरासरी कोणत्या आधावर ग्रहीत धरण्यात आली याबाबत कोणतेच स्पष्टीकरण दिलेले नाही.अर्जदाराच्या जागेवर
३०/०६/२००८ रोजी नविन मीटर बसविण्यात आले त्यावेळी त्यावरील रिडींग ही ०००२ अशी असल्याचे मीटर बदली अहवालावरून दिसते दिनांक २८/११/२००८ रोजी मीटरवरील रिडींग ते ६५० युनिट असल्याचे म्हणजेच ३०/०६/२००८ ते २५/११/२००८ या पाच महीन्याच्या काळात अर्जदाराचा एकुण वीज वापर (६५०-२) ६४८ युनिट असल्याचे स्पष्ट होते. यावरून अर्जदाराचा सरासरी प्रतिमाह वीज वापर हा १३० युनिट असल्याचे दिसुन येते. नोडल अधिकारी यांनी नोव्हेंबर २००७ मध्ये ग्रहीत धरलेला २०० युनिट वीज वापर तसेच डिसेंबर ते नोव्हेंबर या काळात सरासरीवर आधारीत लावण्यात आलेला १८० युनिट वीज वापर हा चुकीचा असल्याचे स्पष्ट होते.त्यामुळे मंच मान्यता देत नाही.

वरील सर्व बाबीचे निरिक्षण केल्यावर अर्जदाराने चुकीच्या वीज बिलाबाबत केलेली तक्रार योग्य असुन ते मानसीक  नुकसान भरपाई मिळण्यास पात्र आहे.

# आदेश

१) महावितरण कंपनीतर्फे नोव्हेंबर २००७ नंतर देण्यात आलेली सर्व वीज बिले रद्द करण्यात येत आहेत.

२) नोव्हेंबर २००७ ते ३०/०६/२००८ पर्यंत अर्जदारास सरासरी १३० युनिट प्रतीमाह प्रमाणे  वीज बिल आकारावे तसेच ३०/०६/२००८ पुढील सर्व वीज बिल मीटरवरील नोंदीप्रमाणे आकारून अर्जदारास ३० दिवसाच्या आत  बिल द्यावे व सुधारीत बिलात कोणतेही व्याज व दंड आकारू नये.

२) अर्जदाराने भरलेल्या वरील काळातील रक्कमेची सुधारीत वीज बिलात वजावट करावी.

३) महावितरण कंपनीने अर्जदारास दिलेल्या मानसीक त्रासापोटी रूपये २५०/- तीस दिवासाच्या आत द्यावे.

४) अर्जदारास सतत चुकीचे वीज बिल आकारूण त्यास मानसीक त्रास दिल्याबद्दल महावितरण कंपनीने त्यांना रूपये ३००/- नुकसान भरपाई द्यावी.

वरील आदेशाचे ग्राहक व महावितरण कंपनी यांनी पालन करावे व त्याबाबत मंचास कळवावे.

गा-हाणे निकाली काढण्यात आले असुन हे ग्राहकास व वितरण कंपनीस कळवावे.

| | | |
|---|---|---|
| **हेमंत अ. कापडिया** | **प्र. अ. सगणे** | **विष्णु अं. हंबिरे** |
| **सदस्य** | **सदस्य/सचिव** | **अध्यक्ष** |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१४८/२००८/६९** **दिनांक ;-**

**प्रति,**
**श्री देवराव किसन खटावकर,**
**प्लॅट न. ९१ गट न.१३८,**
**छत्रपती सातारा परीसर,**
**औरंगाबाद.**

( तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/यु/१४८/२००८/६९ )

आपण दिनांक ०१/११/२००८ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आंत अपिल दाखल करू शकता.

**प्रत,कार्यकारी अभियंता (प्रशासन),**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**म.रा.वि.वि.कं.म. शहर मंडळ, औरंगाबाद**

**सदस्य/सचिव**
**ग्राहक गा-हाणे निवारण मंच**
**म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.**

**विद्युतलोकपालाचा पत्ता,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,**
**६०६-६०८, केशवा,**
**बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.**
**दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.**